# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता.जि.ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट २२५-२२ दिनांक २६/०७/२०२२

## ऑटो रिक्षा चोरी करणाऱ्या आरोपीतांना अटक - माणिकपुर पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.

माणिकपुर पोलीस ठाणे हद्दीमध्ये दिनांक १७/०७/२०२२ रोजी फिर्यादी श्री. कैलास नामदेव गायकवाड यांची बजाज कंपनीची ऑटो रिक्षा कोणीतरी अज्ञात इसमाने चोरी केल्याने त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन माणिकपुर पोलीस ठाणे गु.र.क्र. २६४/२०२२ भा.दं.वि. कलम ३७९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

माणिकपुर पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाने तांत्रिकदृष्टया तपास करुन व गुप्त बातमीच्या आधारे सापळा रचुन आरोपी नामे १) मो. जाफर मोईन शेख, २) मो. सईद रईस शेख, दोन्ही रा.ठी. राजीव नगर, मस्जीद गल्ली, खेरवाडी, बांद्रा पूर्व, मुंबई यांना खेरवाडी, मुंबई परिसरातुन ताब्यात घेवुन दि.२३/०७/२०२२ रोजी अटक करण्यात आली आहे. सदर आरोपीतांकडुन चोरी केलेल्या एकुण ८०,०००/- रुपये किंमतीच्या दोन ऑटो रिक्षा हस्तगत करण्यात आल्या आहे.

सदर आरोपींचा माणिकपुर पोलीस ठाणे १) गु.र.क्र. २६४/२०२२ कलम ३७९ भा.दं.वि. व आचोळे पोलीस ठाणे २) गु.र.क्र. ३३८/२०२२ कलम ३७९ भा.दं.वि. या दोन गुन्हयामध्ये देखील सहभाग निष्पन्न झाला असुन दि.२६/०७/२०२२ रोजी आचोळे पोलीस ठाणे यांनी तपासकामी आरोपीतांचा ताबा घेतला आहे.

सदरची कामगिरी श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ -०२ वसई, श्री. प्रदीप गिरीधर, सहायक पोलीस आयुक्त, वसई विभाग, श्री. संपतराव पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी स.पो.नि. सचिन सानप, पो.उ.नि. तुकाराम भोपळे, पो.ह. शैलेश पाटिल, शामेश चंदनशिवे, धनंजय चौधरी व पो.शि. प्रविण कांदे यांनी केलेली आहे.

......000.....